# University of Mumbai

परीक्षा विभाग/निकाल कक्ष
महात्मा फुले भवन,
विद्यानगरी, सांताक्रुझ (पूर्व),
मुंबई – ४०० ०९८.

क्र.परीक्षा/निकाल कक्ष/ 1817 /२०१६

परिपत्रक :–

आज दि. २५ नोव्हेंबर, २०१६ दुपारी १.०० वाजता मुंबई शहरातील जोगेश्वरी व ओशिवरा या परिसरात भीषण आग लागल्याचे इलेक्ट्रॉनिक प्रसारमाध्यमातुन निदर्शनास आले आहे. याबाबत विद्यापीठाच्या विविध शैक्षणिक विभागांचे संचालक/प्रमुख, विद्यापीठाशी संलग्नित/ संचालित महाविद्यालयांचे प्राचार्य, मान्यता प्राप्त संस्थाचे संचालक/प्रमुख, दुर व मुक्त अध्ययन संस्थेचे प्राध्यापक नि संचालक, विद्यापीठाच्या रत्नागिरी उपकेद्रांचे समन्वयक व सहायक कुलसचिव यांना या परिपत्रकाद्वारे कळविण्यात येते की, उपरोक्त परिसरात मुंबई विद्यापीठाशी संलग्नित असणाऱ्या महाविद्यालयांमध्ये आज दुपार सत्रात ३.०० ते ६.०० या कालावधीत विद्यापीठ घेत असलेल्या तसेच विद्यापीठामार्फत संबंधित महाविद्यालये घेत असलेल्या परीक्षांसाठी जे विद्यार्थी उपरोक्त कारणास्तव रहदारी बंद असल्यामुळे परीक्षा केंद्रावर न पोहचल्यामुळे प्रविष्ठ होऊ शकले नाहीत. अशा विद्यार्थ्यांची आज ३.०० ते ६.०० या कालावधीत असलेली परीक्षा पुन्हा घेण्यात येईल व या परीक्षांचे दिनांक, वेळ व स्थळ स्वतंत्ररित्या परिपत्रक निर्गमित करून लवकरच कळविण्यात येईल.

तरी सर्व संबंधितांना कळविण्यात येते की, उपरोक्त बाबींची नोंद घेऊन विद्यार्थ्यांच्या निदर्शनास आणुन देण्यात यावी ही विंनती.

मुंबई – ४०००९८
दि. २५ नोव्हेंबर, २०१६.

स्था.परीक्षा नियंत्रकाकरिता

प्रत:–

विद्यापीठाच्या विविध शैक्षणिक विभागांचे संचालक/प्रमुख, विद्यापीठाशी संलग्नित/ संचालित महाविद्यालयाचे प्राचार्य, मान्यता प्राप्त संस्थाचे संचालक/प्रमुख, दुर व मुक्त अध्ययन संस्थेचे प्राध्यापक नि संचालक, विद्यापीठाच्या रत्नागिरी उपकेद्रांचे समन्वयक व सहायक कुलसचिव